# विशिष्ट एकक किंवा संस्थांच्या नावाने बचत खाती उघडण्याबाबत

डिसेंबर १४, २००२

संदर्भ : डीबीओडी. डीआयआर. बीसी. ५१/१३.०३.००/२००२-०३

सर्व वाणिज्य बँका
(आरआरबी व एलएबी सोडून)

प्रिय महाशय,

**<u>विशिष्ट एकक किंवा संस्थांच्या नावाने बचत खाती उघडणे</u>**

आमच्या परिपत्रक क्र. डीबीओडी. डीआयआर. बीसी. ५१/१३.०३.०० / २००२-०३ ता. ऑक्टोबर १७, २००० च्या परिच्छेद २ चा संदर्भ घेण्यात यावा. परिपत्रकान्वये बँकांना सरकारी विभाग / एकक / शाखांच्या नांवाने **केंद्र सरकारने** पुरस्कृत केलेल्या, विविध कार्यक्रम / योजनांसाठी वितरित अनुदान (ग्रँट) / सवलती वापरण्यासाठी, संबंधित सरकारी विभागाकडून बँकेस सदर सरकारी विभाग किंवा संस्थेला बचत खाते उघडण्यास परवानगी दिल्याचे अधिकारपत्र दाखल करावयाचे आहे.

२) या बाबतीत, पुनर्विलोकन करतांना, आता असे ठरविण्यात आले आहे की, बँकानी सरकारी विभाग / एकक / शाखांच्या नावाने राज्य सरकारने पुरस्कृत केलेल्या, विविध कार्यक्रम / योजनांसाठी वितरित अनुदान / सवलती वापरण्यासाठी, संबंधित सरकारी खात्याकडून सदर सरकारी विभाग / संस्थेला, बचत खाते उघडण्या परवानगी दिल्याचे अधिकारपत्र दाखल केल्यावर असे खाते उघडले जावे. या अधिकारपत्राची एक प्रत बँकेने नोंदीत ठेवावी. आमच्या प्रमुख निर्देश क्र. डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. ५०/१३.०३.०० / २०००-०१ दि. ११ ऑगस्ट १००१ च्या, परिशिष्ट ५च्या क्र. ७ मध्ये यानुसार बदल केला आहे.

३) बदल करणारा निर्देश क्र. डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. ५०/१३.०३.०० दि. डिसेंबर १४, २००२ सोबत जोडला आहे.

कृपया पोच द्यावी.
आपला विश्वासू
(एम आर श्रीनिवासन)
मुख्य महाव्यवस्थापक

## **विशिष्ट एकक / संस्थांच्या नांवाने बचत खाती उघडणे**

डिसेंबर १४, २००२

संदर्भ डीबीओडी डीआयआर बीसी ५०/१३.०३.००/२००२-०३

**विशिष्ट एकक संस्थांच्या नावे खाती उघडणे बाबत**

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ च्या कलम २१ व ३५ए ने दिलेल्या अधिकारांन्वये, भारतीय रिझर्व्ह बँक, तिच्या प्रमुख निर्देश क्र. डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. ०७/१३.०३.०० / २००१-०२ दि. ११ ऑगस्ट २००१ (वेळोवेळी केलेल्या बदलांसह) मध्ये बदल करण्यासाठी, आणि जनहितार्थ असा बदल करणे जरूरीचे व आवश्यक असल्याचे ठरल्यावरुन असा निर्देश देत आहे की वरील निर्देशातील परिशिष्ट ५ अनु क्र. ७ ऐवजी खालील क्र. ७ चे त्वरित समायोजन करावे :

७. सरकारी विभाग / एकक / शाखा, **केंद्रीय सरकार / राज्य सरकार**, यांनी पुरस्कृत केलेल्या विविध कार्यक्रम / योजनांसाठी वितरित अनुदान / सवलती वापरण्यासाठी संबंधित केंद्र / राज्य सरकारी विभागा कडून बँकेस बचत खाते उघडण्यासाठी अधिकार पत्र दाखल करावे."

निर्देश क्र. डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. ०७/१३.०३.००/२००१-०२ दि. ऑगस्ट ११, २००१ च्या इतर सर्व तरतुदी अबाधित राहतील.

**(के. एल. खेत्रपाल)**
**कार्यकारी संचालक**